पुण्य नगरी
न्यूज @अतुल कांकरिया

# रक्षाबंधन फक्त भाऊ-बहिणीच्या नात्यापुरता मर्यादित नाही : रमेश खरमाळे

**नारायणगाव : प्रतिनिधी**

रक्षाबंधन हे आता बहीण-भावापुरते मर्यादित न राहता रक्षण करणाऱ्या प्रत्येक घटकांशी बांधिल झालेले आहे. निसर्गाशीही रक्षाबंधनाचे नाते जोडले गेले आहे. तसेच आपला जीव धोक्यात घालून भारतीय सीमेवर आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठीही आहे. सैनिकांपर्यंत राख्या पोहोचल्याने सैनिकांचे मनोबल उंचावण्यास मदत होते, असे मत माजी सैनिक व शिवनेर भूषण रमेश खरमाळे यांनी व्यक्त केले.

जयहिंद कॉलेज ऑफ इंजीनियरिंगमध्ये रक्षाबंधनाच्या निमित्ताने 'एक राखी सैनिकांसाठी' हा कार्यक्रम आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैनिक अधिकारी रमेश खरमाळे उपस्थित होते. यावेळी रमेश खरमाळे यांना विद्यार्थ्यींनींनी राख्या बांधल्या व आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमामध्ये सैनिकांना राखी पाठवण्यासाठी १०० पेक्षा जास्त मुलींनी सहभाग घेतला. या सर्व जमा झालेल्या राख्या रमेश करमाळे यांच्या मदतीने सैनिकांपर्यंत पोहोचवण्यात येथील असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गल्हे यांनी सांगितले. या कार्यक्रमाला शैक्षणिक समन्वयक डॉ. वैशाली धेडे, विभागप्रमुख प्रा. शुभांगी सैद, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.